**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **डिजिटल सुरक्षेसाठी 'थांबा, विचार करा, आणि मग कृती करा' या तीन पायऱ्यांचा अवलंब करावा, असं 'मन की बात' मधून पंतप्रधानांचं देशवासीयांना आवाहन.**
2. **काँग्रेस उमेदवारी देण्यासाठी नातीगोती पाहत नसून, जो जिंकेल त्यालाच उमेदवारी दिली जात आहे - विजय वड्डेटीवार यांची माहिती.**
3. **भाजपतर्फे आतापर्यंत विधानसभा निवडणुकीसाठी 121 उमेदवारांची यादी जाहीर.**
4. **राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची यादी जाहीर; हिंगणामधून रमेश बंग यांना उमेदवारी.**

मन की बात

डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा, आणि मग कृती करा या तीन पायऱ्यांचा अवलंब करावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे पंधरावा भाग होता. यावेळी पंतप्रधानांनी उदाहरणादाखल डिजीटल अटकेशी संबंधित फसवणूकीच्या फोन कॉलचं ध्वनीमुद्रण श्रोत्यांना ऐकवलं, फसवणूक करणाऱ्यांची कार्यपद्धती आणि अशा वेळी आपण घाबरून न जायची खबरदारी याविषयी देखील त्यांनी श्रोत्यांना समजावलं. डिजीटल अटक अशी कुठलीही तरतूद कायद्यात नाही, तर ही फसवणूक आहे, अशा प्रकारची फसवणूक करणारे समाजाचे शत्रू आहेत, असं ते म्हणाले. या सगळ्याचा प्रतिकार करण्यासाठी अनेक तपास यंत्रणा आणि राज्य सरकारं परस्पर सहकार्यानं काम करत असून, त्यांच्यातल्या समन्वयासाठी राष्ट्रीय सायबर समन्वय केंद्राची स्थापना केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

***मैं आपको डिजिटल सुरक्षा के तीन चरण बताता हु। रुको, सोचो, एक्शन लो। कॉल आते ही सम्भव हो तो स्क्रीन शॉट ले और रिकॉर्डिंग जरूर करे। दूसरा चरण ह� सोचो, कोई भी सरकारी एजेन्सी फोन पर ऐसी धमकी नहीं देती, नहीं व्हिडिओ कॉल पर पूछताछ करती ह� नहीं ऐसे पैसा की मांग करती ह�। और तीसरा चरण कहता हु, एक्शन लो, राष्ट्रीय साइबर हेल्पलाइन १९३० डायल करे, परिवार और पुलिस को सूचित करे ।***

आशय आणि सर्जनशीलतेमुळे मनोरंजनपर ॲनिमेशनमधली भारतीयांची कामगिरी जगभर नावाजली जाते, त्यामुळेच भारतातील ॲनिमेशन स्टुडिओज, डिस्ने आणि वॉर्नर ब्रदर्स सारख्या जगातील नावाजलेल्या निर्मिती संस्थांबरोबर काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातलं गेमिंग अवकाशही झपाट्यानं विस्तारत असून भारत एक नवी क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं ते म्हणाले. ॲनिमेशन क्षेत्रामुळे भारतीयांची सर्वाधिक निर्मिती असलेल्या व्ही आर अर्थात आभासी पर्यटनालाही मोठी चालना मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. उद्या २८ ऑक्टोबरला जागतिक ॲनिमेशन दिवस साजरा होणार असून, यानिमित्तानं देशाला जागतिक ॲनिमेशन ऊर्जा केंद्र बनवण्याचा संकल्प करायचं आवाहनही त्यांनी केलं. सरदार पटेल यांच्या

१५० व्या जयंती वर्षाला येत्या ३१ ऑक्टोबरपासून, तर १५ नोव्हेंबरपासून भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीला सुरुवात होणार असल्याचं स्मरण त्यांनी श्रोत्यांना करून दिलं. या दोन्ही महापुरुषांसमोरची आव्हानं वेगवेगळी होती, पण देशाची एकता हेच दोघांचं ध्येय होतं असं त्यांनी सांगितलं. बिरसा मुंडा वन फिफ्टी आणि सरदार वन फिफ्टी या हॅशटॅगसह देशाच्या विविधतेतल्या एकतेचा, वारश्याचा उत्सव साजरा करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

आकाशवाणी कार्यशाळा

आकाशवाणीवरील बातम्या या सत्य आणि विश्वासार्ह असतात असा नागरिकांचा विश्वास आहे, कारण बातमी प्रसारित करण्यापूर्वी त्याची विश्वासार्हता वारंवार तपासली जाते, असं प्रतिपादन पत्र सूचना कार्यालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी केलं. आकाशवाणी मुंबई - प्रादेशिक वृत्त विभाग द्वारा मुंबईत आयोजित अंशकालीन वार्ताहर कार्यशाळेचं आज सकाळी  स्मिता वत्स शर्मा, राज्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम, वृत्त विभागाच्या संचालक सरस्वती कुवळेकर, आकाशवाणी मुंबईचे कार्यालय प्रमुख राजकुमार ढवळे आणि कार्यक्रम प्रमुख डॉ संतोष जाधव यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकाशवाणीच्या अंशकालीन वार्ताहरांच्या या एक दिवसीय परिषदेला संबोधित करताना बातमीची निष्पक्षता टिकवून ठेवण्याचं आवाहन चोक्कलिंगम यांनी केलं. जलद बातमी देण्याच्या स्पर्धेत बातमीची विश्वासार्हता गमावता कामा नये. बातमी देताना ती अप्रत्यक्षरित्या प्रायोजित नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी वार्ताहरांची आहे. शिवाय बातमी देताना काही गैरव्यवहार लक्षात आल्यास तात्काळ त्याबद्दल निवडणूक आयोगाला सांगण्याचं आवाहन चोक्कलिंगम यांनी उपस्थित वार्ताहरांना केलं.

मोदी-ब्रिक्स-भेटवस्तू

नुकत्याच रशियात झालेल्या ब्रिक्स परिषदेदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराण आणि उझबेकिस्तानच्या नेत्यांना महाराष्ट्रातील उत्कृष्ट कलाकुसरीचा नमुना असलेल्या भेटवस्तू दिल्या. त्यांनी इराणच्या राष्ट्राध्यक्षांना मदर ऑफ पर्ल या समुद्रातील शंख शिंपल्यापासून बनवलेली फुलदाणी भेट म्हणून दिली. फुलदाणीमध्ये पिवळ्या, काळा, पांढऱ्या आणि राखाडी रंगाच्या विविध छटांचा वापर करण्यात आला आहे.  मोदी यांनी उझबेकिस्तानच्या राष्ट्रपतींना पारंपारिक वारली चित्रकलेचा नमुना  भेट दिला. वारली चित्रकला हा एक आदिवासी कला प्रकार असून तो प्रामुख्याने महाराष्ट्रातील डहाणू, तलासरी आणि पालघर प्रदेशात वसलेल्या वारली जमातीत पहायला मिळतो.

विजय वडेट्टीवार

काँग्रेस उमेदवारी देण्यासाठी नातीगोती पाहत नसून जो जिंकेल त्यालाच उमेदवारी दिली जात आहे, असं काँग्रेसचे नेते  आणि विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार यांनी सांगितलं. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेस आज १४ उमेदवारांची यादी जाहीर करणार असल्याचं  त्यांनी जागावाटपासंदर्भात बोलतांना सांगितलं.

*अनेक पक्षाला आपला मागण्याचा अधिकार आहे, दावा करण्याचा अधिकार आहे. ते मागत आहेत, आज या संदर्भात संध्याकाळी ९ वाजता पर्यंत सर्व चित्र स्पष्ट झालेलं दिसेल. तुम्ही आम्हालाच विचारता आहे महायुती मध्ये काय चाललं आहे अजूनही त्यांचं घोडं अडलं आहे ना सत्तेत राहून, कोणी ५० पाहिजे, कोणी ६० पाहिजे, कोणी ९० पाहिजे  भारतीय जनता पक्षाला हि आघाडी किंवा त्यांच्या महायुतीला अजूनही जागा वाटप करता आलं नाही, प्रचंड त्यांचे भांडणं सुरु आहे. त्यामुळे आम्ही काही जागांना वाट बघतो आहो.*

दरम्यान, काल काँग्रेसने काल जाहीर केलेल्या यादीत १६ नावांचा समावेश आहे. यात यवतमाळच्या दिग्रस मतदारसंघातून माणिकराव ठाकरे यांना, बुलडाणाच्या खामगाव येथून दिलीप सानंदा, अमरावतीच्या मेळघाटमधून डॉ.हेमंत चिमोटे, तर गडचिरोलीमधून मनोहर पोरेटी यांचा समावेश आहे.

**भाजप 121  उमेदवार**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं काल २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यात विदर्भातील मलकापूर येथून चैनसुख संचेती, अकोट मधून प्रकाश  भारसाकळे, अकोला पश्चिम येथून विजय अग्रवाल, वाशिम येथून श्याम खोडे, मेळघाट मधून केवल राम काळे गडचिरोलीतून मिलिंद नरोटे, राजुरा येथून देवराव भोंगले, ब्रह्मपुरीतून कृष्णलाल सहारे, वरोरा इथून करण देवतळे या उमेदवारांचा समावेश आहे. आतापर्यंत भाजपाचे १२१ उमेदवार जाहीर झाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस  शरदचंद्र पवार यादी

राष्ट्रवादी काँग्रेस  शरदचंद्र पवार पक्षाची तिसरी यादी जाहीर झाली असून यामध्ये विदर्भातील मतदार संघापैकी वर्धा जिल्ह्यातील कारंजा येथून  ज्ञायक पटणी, हिंगणघाट येथून अतुल वांदिले तर नागपूरच्या ग्रामीण हिंगणा मधून  रमेश बंग यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. इतर उमेदवारांमध्ये मुंबईच्या अणुशक्तीनगर मधून फहाद अहमद, पिंपरी चिंचवड मधून राहुल कलाटे, भोसरीतून अजित गव्हाणे, बीड जिल्ह्यातील  माजलगाव मधून मोहन बाजीराव जगताप, परळीतून राजेसाहेब देशमुख आणि सोलापूर जिल्ह्यातील मोहोळमधून सिद्धी रमेश कदम पक्षातर्फे लढणार आहेत.

जिल्हाधिकारी

निवडणुकीची कामं आत्मविश्वासाने सामोरं जाऊन गांभीर्यपूर्वक करावीत. कुठलीही चूक राहता कामा नये याबाबत अधिका-यांनी दक्ष रहावं, अशा सूचना वर्ध्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी  देवळी इथल्या भोंग मंगल कार्यालय इथं आयोजित निवडणूकविषयक प्रशिक्षणात दिल्या. देवळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रियंका पवार, तहसिलदार समर्थ क्षीरसागर यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. दोन सत्रात एकूण 1 हजार 356 अधिकारी-कर्मचा-यांनी हे प्रशिक्षण घेतलं. हिंगणघाट

विधानसभा क्षेत्रातील मतदान अधिकारी आणि कर्मचा-यांकरिता आयोजित निवडणुकीच्या प्रथम प्रशिक्षण सत्रासही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

सुधीर मुनगंटीवार नामांकन

भाजपचे नेते आणि राज्याचे वनमंत्री तसेच बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार उद्या सोमवारी, दि. २८ ऑक्टोबरला सकाळी ११.०० वाजता चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथील उपविभागीय कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून मुनगंटीवार हे सलग सहा विधानसभा निवडणुकांमध्ये विजयी झाले आहेत.

मद्य साठा जप्ती

राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचार संहिता सुरू असताना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करीत परराज्यातील मद्याचा साठा जप्त केला आहे. उत्तर नागपूरच्या जरीपटका पोलीस स्टेशन नागपूर हद्दीत असलेल्या कोराडी रोड, ओम नगर येथील विजय धरमदास आसुदाणी यांच्या संत ज्ञानेश्वर सोसायटी प्लॉट कमांक 31 येथून हा मद्याचा साठा जप्त करण्यात आला.यात मद्याच्या 448 सिलबंद बाटल्या तसेच वाहनासहित आणि जप्त केलेल्या मोबाईलसहित एकूण 38 लाख 69 हजार 431 रुपयांचा मुद्येमाल जप्त करीत गुन्हयाची नोंद करण्यात आली.

राष्ट्रीय एकता दिवस

राष्ट्रीय छात्र सेना - एनसीसी ग्रुप नागपूरने आज राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला. राष्ट्रीय एकता दिवस दरवर्षी 31 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. भारताच्या राजकीय एकात्मतेत महत्त्वाची भूमिका बजावणारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यासाठी 2014 मध्ये भारत सरकारने हा उपक्रम सुरू केला होता. 31 ऑक्टोबर रोजी दिवाळी असल्याने आजच राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाचं औचित्य साधून एनसीसी ग्रुप नागपूरने सायकल रॅली काढली. यात ग्रुप कॅप्टन खुशाल व्यास, ग्रुप कमांडर नागपूर यांनी सकाळी 7.30 वाजता सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. रॅलीत सुमारे 100 कॅडेट्स सहभागी झाले होते. ही रॅली युवाशक्ती भवन (NCC ग्रुप मुख्यालय) येथून सुरू झाली आणि नागपूर शहरातील हनुमान मंदिर सेमिनरी टेकडी-फुटाळा तलाव-रवी नगर चौक-धरमपेठ चौक-वॉकर स्ट्रीट ते परत युवाशक्ती असं सुमारे 10 किलोमीटरचे अंतर या रॅलीने कापले. रॅली सुरु होण्यापूर्वी रॅलीमध्ये सहभागी झालेल्या कॅडेट्सकडून देशाच्या अखंडतेची प्रतिज्ञा घेण्यात आली.

*****